दैनिक
अचूक वेध, अचूक बातमी
# अक्षराज
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध
वर्ष : ०४, अंक : ५२
पाने : ०४, किंमत : ०३ रुपये
संपादक : विनोद कैलास गोरे
RNI NO. : MAHMAR/2022/82056
Follow Us On : www.aksharaj.com
Email : newsaksharaj2021@gmail.com
बुलडाणा, शनिवार, दि.०५ ऑक्टोबर २०२४

### आजचा रंग करडा



नवरात्रातील दुर्गे मातेच्या तिसऱ्या रूपाचे नाव चंद्रघंटा असे आहे. चंद्रघंटे मातेचे हे रूप अतिशय शक्तिदायक व कल्याणकारी आहे. तिच्या मस्तकावर घंटेच्या आकाराचा अर्धचंद्र असल्याने तिला चंद्रघंटा देवी असे म्हणतात. तिची कांती सोन्यासारखी चमकदार आहे. तिला दहा भुजा आहेत. तिच्या प्रत्येक भुजेमध्ये तिने खडक, कमडलू, कमळ अशी विविध आयुध धारण केली आहेत. चंद्रघंटा देवी सिंहारूढ आहे, तसेच तिची मुद्रा नेहमी युद्ध तत्पर असते. तिच्या नुसत्या घंटेचा आवाज भक्तांचे रक्षण करतो. तिच्या कृपेने अलौकिक व दिव्य अनुभव तिच्या भक्तांना मिळतो. चंद्रघंटा मातेची आराधना केल्याने शरीरामध्ये क्रांती गुणांची वाढ होते. आवाजात मधुरता येते. शांती व सुखाचा अनुभव मिळतो. तिच्या उपासनेने संसारिक संकटातून भक्तांना मुक्ती मिळते.

## अहमदनगर नव्हे अहिल्यानगर!

## महाराष्ट्र सरकारच्या प्रस्तावाला केंद्र सरकारची मंजुरी...

अहमदनगर जिल्ह्याचं नाव अहिल्यानगर करण्याच्या मागणीला केंद्र सरकारने मंजुरी दिली आहे. ही मागणी गेल्या अनेक दिवसांपासून होत होती. राज्य सरकारने पाठवलेल्या प्रस्तावाला केंद्र सरकारने मंजुरी दिली आहे. राज्याचे महसूल आणि पशुसंवर्धन दुग्धविकास मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी सोशल मीडियावर पोस्ट करत ही माहिती दिली आहे. त्यामुळे आता अहमदनगर जिल्हा अहिल्यानगरनावाने ओळखला जाणार आहे.

**अनेक दिवसांपासून होत होती मागणी**

अहमदनगर जिल्ह्याचे नाव अहिल्यानगरअसे करण्याची मागणी गेल्या कित्येक वर्षांपासून करण्यात येत होती. औरंगाबाद आणि उस्मानाबाद जिल्ह्यांची नावं बदलल्यानंतर अहमदनगर जिल्ह्याचं नाव बदलण्याच्या मागणीला जोर चढला. गेल्या वर्षी चोंडी येथे झालेल्या अहिल्यादेवींच्या जयंती दिनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी अहमदनगर जिल्ह्याचे नाव बदलण्याची घोषणा केली होती. त्यांनी जिल्ह्याला पुण्यश्लोक अहिल्यादेवी यांचं नाव देण्याची घोषणा केली होती.

**अहिल्यानगर नामांतराची वचनपूर्ती!!!**

नगर जिल्ह्याचे नामांतर अहिल्यानगर




करण्याच्या प्रस्तावाला केंद्र सरकारने मंजुरी दिली. आज मंत्रिमंडळाच्या बैठकीत जिल्ह्याचे नामकरण अहिल्यानगर करण्यास मान्यता मिळाल्याने वचनपूर्ती झाल्याचा मनस्वी आनंद आहे. निर्णय होण्याकरीता सहकार्य करणारे विश्वनेते पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे आभार. अशी पोस्ट राधाकृष्ण विखे पाटील यांनी केली आहे.

महिनाभरापूर्वी रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी पत्रकार परिषदेत रेल्वे स्थानकाचं नाव बदलण्यात येणार असल्याचं जाहीर केलं होतं. त्यावेळी अहमदनगर जिल्ह्याचं नाव बदललं जाणार हे स्पष्ट झालं होतं. विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता लागण्यापूर्वी हा निर्णय आता झाला आहे.

**१३ मार्च २०२४ ला काय घडलं?**

अहमदनगर शहराचे नाव 'अहिल्यानगर' करण्याचा राज्य मंत्रिमंडळाने १३ मार्च २०२४ ला घेतला. तर पुणे जिल्ह्यातील वेल्हे तालुक्याचेही नाव बदलण्यात आलं, या तालुक्याला राजगड असे नाव देण्यात आलं. या निर्णयाबाबत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आनंद व्यक्त केला होता. आता विधानसभा निवडणुकीच्या आधी केंद्र सरकारने अहमदनगरचं नाव अहिल्यानगर करण्याला मंजुरी दिली आहे. कुठल्याही जिल्ह्याचं किंवा शहराचं किंवा ठिकाणाचं नाव बदलण्यासाठी भारतीय राज्यघटनेत काही खास उल्लेख नाही. नामांतर करण्याबाबत केंद्र सरकारने राज्यांना काही मार्गदर्शक सूचना केल्या आहेत अशी माहिती सर्वोच्च न्यायालयाचे वकील दिलीप तौर यांनी एका वृत्तवाहिनीशी बोलताना दिली होती. केंद्र सरकारच्या म्हणण्यानुसार राज्याला त्यांच्या जिल्ह्याचं नाव बदलायचं असेल तर त्यांना विधानसभेत तसा निर्णय घ्यावा लागेल. त्यानंतर केंद्र सरकारच्या पाच विभागांकडून त्यासाठी ना-हरकत प्रमाणपत्र मिळवावं लागेल. यानंतर नामांतरावर अंतिम निर्णय केंद्र सरकार घेईल.

## महायुती सरकारने केली अहिल्यानगर नामांतराची वचनपूर्ती – विखे पाटील

**अक्षराज : वसंत रांधवण**



**दि.०४, अहमदनगर :** जिल्हाला पुण्यश्लोक अहिल्यादेवींचे नाव देण्याच्या मागणीवर आज राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत आज शिक्कामोर्तब झाले. नामांतराच्या या प्रस्तावाला केंद्र सरकारने मंजूरी दिल्यानंतर आता अहमदनगर जिल्हा अहिल्यानगर म्हणून ओळखला जाणार आहे. नामांतराच्या या निर्णयाचे महसूलमंत्री तथा पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी स्वागत करून आनंद व्यक्त केला आहे. पुण्यश्लोक अहिल्यादेवींच्या जयंतीदिनास तिनशे वर्ष पूर्ण होत असतानाच हा निर्णय होणे ही एक ऐतिहासिक घटना असल्याची प्रतिक्रिया त्यांनी व्यक्त केली. गेल्या अनेक वर्षापासून जिल्ह्याला पुण्यश्लोक अहिल्यादेवीचे नाव देण्यात यावे. अशी मागणी सातत्याने होत होती. चोंडी येथे झालेल्या अहिल्यादेवींच्या जयंतीदिनाच्या कार्यक्रमात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी अहमदनगर जिल्ह्याला, पुण्यश्लोक अहिल्यादेवींचे नाव देण्याची घोषणा केली होती. त्यानंतर पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी केंद्र आणि राज्य सरकारकडे याबाबत पाठपुरावा केला होता. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांना ही नामांतराच्या प्रस्तावाला तातडीने मंजूरी देण्याचे विनंती पत्र दिले होते. यापुर्वी रेल्वे मंत्रालयाने अहिल्यानगर नावाला कोणतेही हरकत नसल्याचे राज्य आणि जिल्हा प्रशासनाला कळविले होते. केंद्र सरकारने अहिल्यानगर नामांतराच्या प्रस्तावाला मंजूरी दिल्यानंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या मंत्रीमंडळाच्या बैठकीत या ऐतिहासिक निर्णयावर शिक्कामोर्तब करण्यात आले. या निर्णयाबद्दल महसूल तथा पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी आनंद व्यक्त केला. नामांतर होण्यासाठी सहकार्य केल्याबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा तसेच मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांचे आभार व्यक्त केले. हा निर्णय होण्यासाठी योगदान देता आले. याचा आनंद आहे. महायुती सरकारने दिलेल्या शब्दांची वचनपूर्ती केल्याचे ही त्यांनी सांगितले.

## ओबीसी वर्गाला सन्मान मिळवून देणार- योगेश टिळेकर

**अक्षराज : धर्मेंद्र वर्पे**

**दि.०४, खंडाळा (सातारा) :** अठरा पगड जाती व बारा बलुतेदारांना बरोबर घेऊन छत्रपती शिवाजी महाराजानी म हाराष्ट्रात स्वराज्य निर्माण केले होते.त्याच शिवप्रभूंच्या व बहुजनांच्या महाराष्ट्रात आज चाललय काय? जाती जाती मध्ये भांडणे लावून स्वतः:ची राजकीय पोळी भाजण्याचे काम महाराष्ट्रात काही मंडळी करत आहेत.

महाराष्ट्रात जातीपातीमध्ये विखुरलेला बहुजनांना हिंदु बहुजन रॅलीच्या माध्यम तून एकत्र आणण्याचे काम आगामी काळात करणार असून सरकारने ओबीसी महामंडळ सुरु करण्याचे काम केले. ओबीसींना मोठ्या प्रमाणावर निधी व ताकद दिली आहे.आगामी काळात मायक्रो ओबीसी व ओबीसींना सन्मान



मिळवून देण्याचे काम करु असे प्रतिपादन विधान परिषदेचे आमदार योगेश टिळेकर यांनी केले.

संत सावता क्रांती परिषद महाराष्ट्र यांच्या वतीने आमदार योगेश टिळेकर यांच्या नेतृत्वाखालील नायगाव ते चौंडी यात्रेचा प्रारंभ नायगाव येथे ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले व महात्मा फुले यांना अभिवादन करुन करण्यात आला. यावेळी महाराष्ट्र ओबीसी प्रभारी खासदार संगमलाल गुप्ता, ओबीसी मोर्चा प्रदेशाध्यक्ष संजय गाते, रंजना टिळेकर, गिताजंली अभंग, महाराष्ट्र प्रदेश सदस्य अनुप सूर्यवंशी, सरपंच स्वाती जमदाडे, माजी सरपंच साधना जगन्नाथ नेवसे, अनिरुद्ध गाढवे,ऋषीकेश धायगुडे, अनिल कुदळे, हर्षवर्धन शेळके आदी मान्यवर उपस्थित होते.

खासदार संगमलाल गुप्ता म्हणाले,सोशित लोकांना शिक्षण देण्याचे काम महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांनी केले. बहुजन हिंदु समाजाला जागे करण्यासाठी आ.योगेश टिळेकर यांनी ही यात्रा सुरु केली केली आहे.म हाराष्ट्र ही साधु संताची राष्ट्रपुरुषांची भूमी आहे. देशात सोशित वंचित घटकासाठी तसेच आबीसी मायक्रो ओबीसींसाठी भाजपा सरकार काम करत आहे.सोशित घटकांना सन्मान देण्याचे काम भाजपा सरकार करत आहे. प्रास्ताविक निखील झगडे यांनी केले, वैभव कांबळे यांनी आभार मानले.

## श्री.बालयोगी परमहंस महेश्वरानंद महाराजांची आपल्या छातीवर घटस्थापना करुन अनुष्ठानास सुरुवात



**अक्षराज : अशोक कुलकर्णी**

**दि.०४, धाराशिव :** आई राजा उदो, उदो च्या जयघोषात व प्रत्येक हिंदु बांधवांच्या घरामध्ये घटस्थापना होऊन दिनांक ०३ ऑक्टोबर रोजी नळदुर्ग शहर व परीसरात शारदीय नवरात्र महोत्सवास मोठ्या उत्साहात सुरवात झाली. यावेळी शारदीय नवरात्र महोत्सवानिमित्त नळदुर्ग शहरातील ६ ठिकाणी देवींच्या मूर्तींची प्रतिष्ठापना करण्यात आली आहे. यावेळी महान तपस्वी श्री बालयोगी परमहंस महेश्वरानंद महाराज हे दुपारी १.३० वाजता आपल्या छातीवर घटस्थापना करून अनुष्ठानास सुरवात केली आहे. पुढील १० दिवस श्री महेश्वरानंद महाराज हे आपल्या छातीवर घटस्थापना करून एकाच आसनामध्ये राहुन अतिशय कठीण अनुष्ठान करणार आहेत.आई राजा उदो, उदो च्या जयघोषात नळदुर्ग शहर व परिसरात दि. ३ ऑक्टोबर शारदीय नवरात्र महोत्सवास मोठ्या उत्साहात प्रारंभ झाला आहे. प्रारंभी सकाळी प्रत्येक हिंदु बांधवांच्या घरात घटस्थापना करण्यात आली. नळदुर्ग शहरात शारदीय नवरात्र महोत्सवाचा मुख्य कार्यक्रम शहरातील प्राचिन असणाऱ्या श्री अंबाबाई मंदिरात होत आहे. याठिकाणी जगदंबादेवी (अंबाबाई) देवस्थान ट्रस्ट व श्री अंबाबाई मंदिर जीर्णोद्धार समितीच्या वतीने विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहेत. यावर्षी शारदीय नवरात्र महोत्सवाचे मुख्य आकर्षण म्हणजे अंबाबाई मंदिर परीसरात महान तपस्वी श्री बालयोगी परमहंस महेश्वरानंद महाराज हे आपल्या छातीवर घटस्थापना करून अनुष्ठान करणार आहेत. ज्या ठिकाणी श्री महेश्वरानंद महाराज हे कठीण व लोक कल्याणासाठी अनुष्ठान करणार आहेत त्याठिकाणी सकाळी १० वा. संकल्प यज्ञ करण्यात आला. यावेळी रुद्राभिषेक करण्यात आला. यावेळी ५१ हजार रुद्रास सिद्ध करण्यात आले. हे सिद्ध करण्यात आलेले रुद्राक्ष श्री महेश्वरानंद महाराज यांच्या हस्ते दि. ४ ऑक्टोबर पासुन भाविकांना वाटप करण्यात येणार आहे. त्याचबरोबर ठिकाणी देवींच्या मूर्तींची प्राणप्रतिष्ठापना करण्यात आली. हा संकल्प यज्ञ दुपारी दीड वाजेपर्यंत चालला. यानंतर दुपारी दीड वाजता श्री महेश्वरानंद महाराज हे आपल्या छातीवर घटस्थापना करुन अनुष्ठानास सुरुवात केली आहे. आता पुढील दहा दिवस म्हणजे दि. १२ ऑक्टोबर पर्यंत श्री महेश्वरानंद महाराज हे आपल्या छातीवर घटस्थापना करून एकाच आसनात अन्न --पाणी तसेच सर्व नैसर्गिक विधिंचा त्याग करून हे अनुष्ठान करणार आहेत. नळदुर्गाच्या भुमित हे अनुष्ठान होत आहे. हे खरे तर नळदुर्गकरांचे भाग्य आहे.त्यामुळे नळदुर्ग शहर व परिसरातील हिंदू बांधवांनी या ठिकाणी दर्शनाचा लाभ घेणे गरजेचे आहे. शारदीय नवरात्र महोत्सवानिमित्त नळदुर्ग शहरात शिवशाही तरुण मंडळ, ब्राम्हण गल्ली, जय भवानी तरुण मंडळ, जय हिंद तरुण मंडळ, व्यासनगर, भवानीनगर व इंदिरानगर या ६ ठिकाणी देवींच्या मूर्तींची प्रतिष्ठापना करण्यात आली आहे. दि.०३ ते १२ ऑक्टोबर या कालावधीत साजरा होणाऱ्या श्री अंबाबाई नवरात्र महोत्सवानिमित्त जगदंबादेवी (अंबाबाई) देवस्थान ट्रस्ट व अंबाबाई मंदिर जीर्णोद्धार समितीच्या वतीने भरगच्च कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या सर्व कार्यक्रमांचा लाभ भाविकांनी घ्यावा असे आवाहन करण्यात आले आहे.

## लोकसभेत जमिनीवर आले म्हणून बहिणी लाडक्या झाल्या!

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०४, बुलडाणा :** काही महिन्यांपूर्वी पार पडलेल्या लोकसभा निवडणुकीत राज्यातील आया बहिणींनी पराभवाचा जबर तडाखा दिला. यामुळे 'जमिनीवर' आलेल्या राज्यातील महायुती सरकारने ऐन विधानसभा निवडणुकांच्या तोंडावर 'लाडकी बहीण' योजना अंमलात आणली. माता भगिनी अचानक सत्ताधारी नेत्यांच्या लाडक्या बहिणी झाल्या, अशी टीका राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार ) महिला आघाडीच्या प्रदेशाध्यक्ष रोहिणी खडसे यांनी केली. दीड हजार द्यायचे आणि बहिणीकडून अप्रत्यक्षपणे पाच हजार उकळायचे, असा हा गोरखधंदा आहे, असे त्या म्हणाल्या.

दिशा जिल्हा महिला बचत गट फेडरेशनच्या वतीने येथे आयोजित तीन दिवसीय महिला उद्योजक मेळावा आणि महिला बचत गट प्रदर्शनीचे रोहिणी खडसे यांच्या हस्ते उद्‌घाटन झाले. यावेळी त्या बोलत होत्या. ४ ते ६ ऑक्टोंबर दरम्यान मलकापूर मार्गावरील 'एआरडी मॉल'च्या मागील मैदानात ही प्रदर्शनी आयोजित करण्यात आली आहे. प्रदर्शनीचा उद्घाटन समारंभ शुक्रवारी, ४ ऑक्टोबर रोजी दुपारी थाटात पार पडला . यावेळी शिवसेना (ठाकरे ) उपनेत्या सुषमा अंधारे, प्रदेश काँग्रेस समितीच्या राज्य प्रवक्ता तथा सरचिटणीस हेमलता पाटील, जयश्री शेळके यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती. यावेळी जिल्ह्यातील बचत गट पदाधिकारी, सदस्या यांची भरगच्च उपस्थिती होती. रोहिणी खडसे म्हणाल्या



की, राज्यकर्ते दीड हजार रुपये देऊन खूप काही दिल्याचा आव आणत आहेत. मात्र दीड हजार द्यायचे आणि महिलांच्या 'बजेट'मधून पाच हजार उकळायचे असा हा खेळ आहे. मागील काही दिवसातच सर्व प्रकारच्या डाळी, गोडे तेल, साखर, शेंगदाणे खोबरे, गॅस चे दर। भरमसाठ वाढविण्यात आले आहे. यातून ही बाब स्पष्ट होते. 'पंधरासो रुपये देंगे, लेकीन पाच हजार लेके जाऐंगे' असा हा सगळा खेळ आहे. तरीही राज्यकर्ते उपकाराची भाषा करतात, अशी खंत खडसे यांनी बोलून दाखविली.

**महिलांच्या अपमानामुळेच रामायण...**

**अन् महाभारत...**

युती शासनाच्या काळात महिलांचा आवाज दाबण्याचा प्रयत्न करण्यात येत असून महिला ,युवतीच नव्हे बालिका वरील अत्याचाराच्या घटनेत वाढ झाली आहे. या पीडित शोषित माता बहिणींचा आक्रोश, किंकाळ्या, रुदन या सरकारला ऐकू येत नाही, असे भयावह चित्र आहे. नेत्या असो की सामान्य महिलांवर दवाब तंत्राचा वापर करण्यात येत आहे. सत्ताधारी नेते आमदार यांच्याकडून महिलांचा जाहिर अवमान, उपमर्द करण्यात येत असल्याचे विदारक चित्र आहे. मात्र महिलांचा उपमर्द झाला की रामायण घडते, महाभारत घडते याचे भान राज्य कर्त्यांनी ठेवावे, असा इशारा त्यांनी दिला.

मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाला ही आनंदाची बाब आहे. याचा उदोउदो करणाऱ्या राज्य सरकारने राज्यातील खेड्यापाड्यात मराठी भाषेत शिक्षण देणाऱ्या तब्बल ६०० शाळा बंद केल्या आहे. हे करंटे काम करणाऱ्या सरकारने एक अख्खी पिढी बरबाद केल्याचा घणाघात रोहिणी खडसे यांनी यावेळी केला.

राज्यात महाविकास आघाडीचे सरकार येणार ही काळ्या दगडावरची रेष आहे.आमचे सरकार आल्यावर आम्ही 'लाडकी शाळा' ही मोहीम राबविणार, अशी घोषणा त्यांनी केली. राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाच्या जिल्हाध्यक्ष रेखा खेडेकर, बुलडाणा अर्बन चॅरिटेबल ट्रस्टच्या अध्यक्ष कोमल झंवर, काँग्रेसच्या प्रदेश सचिव स्वाती वाकेकर, मृणाली सपकाळ , मिनल आंबेकर, सरिता एकडे, नंदिनी टारपे, पद्मजा लिंगाडे, अर्चना खेडेकर, मालती शेळके, लक्ष्मी शेळके, कमल बुधवत, हिना सौदागर, महिला उद्योजिका सीताबाई मोहिते यांची विशेष उपस्थिती होती . महिला बचत गटाच्या पदाधिकारी आणि सदस्यांची यावेळी भरगच्च उपस्थिती होती. उद्घाटन सोहळ्यापूर्वी समाज प्रबोधनकार प्रवीण दवंडे यांचे कीर्तन रंगले. विविध कार्यक्रमांची रेलचेल राहणार आहे.

# संपादकीय



## 'विकसित भारता'चे स्वप्न आणि 'व्यवस्थे'चे वास्तव

सामान्य माणसाच्या दैनंदिन आयुष्यातल्या प्रश्नांची उदाहरणे : 'माझी बस का उशिरा येते?' हा एसटीने प्रवास करणाऱ्या विद्यार्थिनीला पडणारा प्रश्न. 'माझ्या विहिरीतील पाणी लवकर का आटते?' हा मराठवाडयातील छोटया शेतकऱ्याचा प्रश्न. 'मी बनवलेल्या फर्निचरला मागणी का नाही?' हा शहरातील सुतारकाम-उद्योजकाला पडणारा प्रश्न. त्याचप्रमाणे 'बारावीच्या मार्कांवर माझ्या मुलीला डॉक्टर का होता येत नाही?' हे सर्व भारतातील बहुतांश लोकांच्या रोजच्या जीवनातले प्रश्न आहेत. यांना आपण 'मूलभूत भौतिक प्रश्न' असे म्हणूया.

आपली राजकीय व प्रशासकीय परिस्थिती बघितली तर घटनेप्रमाणे, केंद्रीय व्यवस्थेला सर्वोच्च स्थान आणि राज्यव्यवस्थेला दुय्यम स्थान आहे. केंद्रीय व्यवस्थेत केंद्र शासनाकडे, आणि त्यातही विशेषत: पंतप्रधान पदाकडे सत्तेचे आत्यंतिक केंद्रीकरण झालेले आहे. केंद्र शासनाचे विभाग व उपक्रम, 'आयएएस'प्रणीत प्रशासन व्यवस्था, आयआयटी आदी उच्चशिक्षण संस्था, भारतीय हवामान विभाग अशा वैज्ञानिक संस्था मिळून ही राष्ट्रीय व्यवस्था चालवतात. दुष्काळ जाहीर करण्यापासून खाद्यपदार्थांची चाचणी याचे तांत्रिक निकष व सर्वेक्षण पद्धती या संस्था ठरवतात. स्थानिक पातळीवर उपयोगी पडणारे ज्ञान निर्माण करण्याचे राज्यांचे अधिकार खूपच मर्यादित आहेत आणि ज्ञाननिर्मितीची क्षमताही कमी आहे.

अशा केंद्रीकृत व्यवस्थेत कार्यकारी अधिकार हे वरच्या पातळीवर एकवटतात. वैद्यकीय पदवीच्या प्रवेशासाठी राष्ट्रीय पातळीवरची एकच परीक्षा, हे अशा अधिकारांच्या केंद्रीकरणाचेच उदाहरण. या केंद्रीय प्रशासन व्यवस्थेचे लोकसभा व राज्यसभा यांना उत्तरदायित्व अत्यंत कमी आहे. राहिलेच, तर ते सर्वोच्च न्यायालय आणि काही प्रमाणात प्रसारमाध्यमांशी आहे. अनेक क्षेत्रांत वस्तुनिष्ठ माहितीचा अभाव दिसतो तो यामुळे. राज्यांच्या सार्वजनिक बस सेवेचा तुलनात्मक अभ्यास, रेल्वे अपघातांचे विश्लेषण अथवा कोविड-बळींची अधिकृत टक्केवारी यात राज्याराज्यांमधील मोठी तफावत याची कारणमीमांसा – असे अभ्यास क्वचितच मांडले जातात. त्यामुळे, आपल्या समस्यांच्या सोडवणुकीसाठी ज्ञाननिर्मिती क्वचितच होते.

राज्य पातळीवरही असेच केंद्रीकरण दिसते. सर्व सत्ता ही मुख्यमंत्री अथवा वरिष्ठ मंत्रीपदांकडे एकवटलेली दिसते. विधिमंडळाशी राज्य शासनाचे उत्तरदायित्व हे पूर्णपणे राज्याची राजकीय संस्कृती, अभिव्यक्तिस्वातंत्र्य आणि स्वतंत्र माध्यमांचे अस्तित्व यावर अवलंबून असल्याचा आजचा काळ. अशा वेळी, लोक-चळवळी आणि लोकांनी चालवलेली स्थानिक प्रसारमाध्यमे हीच स्थानिक प्रश्नांकडे लक्ष वेधणारी साधने ठरतात. या गोष्टी राज्यपरत्वे बदलतात. कोविड-बळींच्या अधिकृत टक्केवारीतील फरकामागे हे प्रमुख कारण आहे. उत्तर प्रदेशात जे चालून जाते ते गोव्यात वा कर्नाटकात चालत नाही! अर्थव्यवस्थेचा विचार केल्यास, आपली एक राष्ट्रीय अर्थव्यवस्था आहे आणि तिला जोडलेल्या अनेक छोटया-मोठया प्रादेशिक अर्थव्यवस्था आहेत.

आज प्रादेशिक अर्थव्यवस्थांचे राष्ट्रीय अर्थव्यवस्थेवर अवलंबित्व मोठया प्रमाणात वाढताना दिसते. देशाची संपत्ती ही शंभरेक बडया व्यापारी-उद्योजक घराण्यांच्या हातात एकवटली आहे. छोटया उद्योजकांचे त्यांच्या प्रादेशिक बाजारपेठेतही स्थान कमी होऊन, बडया कंपन्याच विस्तारत आहेत. देशातल्या फक्त २० टक्के लोकांकडे ८० टक्के संपत्ती एकवटली आहे. उरलेली ८० टक्के लोकसंख्या ही असंघटित क्षेत्रात काम करीत आहे आणि त्यातले बहुतांश लोक तुटपुंज्या पगारावर वरच्या २० टक्के बडया लोकांची सेवा करीत आहेत. लोकांकडून परिस्थितीचे योग्य आकलन होणे, प्रश्नांच्या अभ्यासाची मागणी होणे व प्रशासनाकडून समस्यांची विश्लेषणात्मक मांडणी होणे ही कुठल्याही सशक्त लोकशाहीसाठी आवश्यक गोष्ट असते. या माहितीचे रूपांतर लोकचळवळीपासून मतपेटीपर्यंत होत असते. आपली परिस्थिती याउलट आहे. निवडणुकांचा हंगाम जवळ आला आहे. त्यात शिवाजी महाराजांच्या तलवारीपासून मशिदींचे अवैध बांधकाम, सावरकरांबद्दल राहुल गांधींची वक्तव्ये, पॅकेजच्या घोषणा- यांसारखे विषय प्रसारमाध्यमे आपल्यासमोर ठेवत आहेत. लोकही दर्जेदार सार्वजनिक सेवा मिळण्यासाठी आग्रही राहण्याऐवजी शासनाकडून मिळणाऱ्या 'लाडक्या' सवलती घेण्यात मग्न आहेत!

## अभिजात मराठी..




साजरी हो महाराष्ट्री
जल्लोषात रे चौसष्ठी
विरोधाभासजाणता
मन होते दुःखी कष्टी

बनवले जातो चक्क
बदलून फक्त पाटी
राहिलो नावा पुरता
पाटीवर नाव मराठी

ठेच लागता आई गं
येई मातृभाषा ओठी
इतर वेळी इतरभाषा
मराठी रांगेत शेवटी

मराठीत बोललो तर
ठरलो जातो गावठी
बुध्दी भ्रष्ट झालेली
अशी आमची कवटी

कॉन्व्हेंटमधे घालावी
आधी आपली कार्टी
सुग्रासभोजन सोडून
चिवड फुके खरकटी

असेभाषा कुठलीही
असणार स्वल्प त्रुटी
नितळ तळाशी पहा
लाभेभौत्तीक कोटी

बहुभाषिक जरुर हो
इंग्रजी मिरव ललाटी
हृदय मंदिरात जागा
ठेवावी मराठी साठी

मिळे अभिजातदर्जा
बदलती सर्व चौकटी
सुखवे साक्षात विठ्ठल
रे कर ठेवलेला कटी

**- हेमंत मुसरीफ, पुणे.**
**९७३०३०६९९६.**

अक्षराज
अचूक वेध, अचूक बातमी

## चंद्रघंटा..

प्रसादे तनुये महयं
चंद्रघण्टति विश्रुता
मंगलमय ती भक्ता
काल वाटे विकृता

नवरात्र तृतीयदिनी
चंद्रघंटा अवतारात
दुर्गादेवी सिंहारुढ
ठसली ती अंतरात

घंटेसम ती चंद्रकोर
सुशोभित मुकूटात
म्हणूनचं चंद्र घंटा
माते तुज म्हणतात

सुवर्ण कांती शरीरा
सुगंध ये परिसरात
स्फुल्लिंग फुलतात
आरती गाता सुरात

रुद्ररुप दिसे असूरा
धडकी भरे ऊरात
निर्भयता सबलता
उर्जा उत्पन्न नरात

विविधआयुधे शोभे
महा माये दहा हात
सप्तशती पाठहोती
शांती नांदते घरांत

**- हेमंत मुसरीफ, पुणे.**
**९७३०३०६९९६.**

अक्षराज
अचूक वेध, अचूक बातमी

# ।। देवीच्या साडेतीन शक्तिपीठांचे दर्शन.... ।।

**दिलीप देशपांडे.**
**जामनेर. जि.जळगांव.**
**मोबा-८९९९५६६९१७**

महाराष्ट्रात देवीची साडेतीन शक्तीपीठ प्रसिद्ध आहेत. श्री महालक्ष्मी (अंबाबाई)- कोल्हापूर, श्री रेणुका माता-माहूर व श्री तुळजाभवानी- तुळजापूर .ही पूर्ण .तर श्री सप्तशृंगी- वणी हे अर्धे शक्ती पीठ आहे. नवरात्रात या सर्व ठिकाणी भाविकांची दर्शनासाठी गर्दी असते.दर्शनाने मनाला खूपच समधान मिळते. ऊर्जा मिळते. म्हणूनच ज्याची जी कुलदेवी आहे,ते वर्षादोन वर्षांत कुलदेवीच्या दर्शनासाठी जातात. जाणे झाले नाही तर गावातील मंदिरात जावून,पातळ, खणानारळाने ओटी भरतात. नवरात्री उत्सवात ह्याशक्ति पिठांचे दर्शन खूपच फलदायी असते.

**१) श्री महालक्ष्मी मंदिर, (अंबाबाई) कोल्हापूर :-**

महाराष्ट्रातील साडेतीन शक्तिपिठांपैकी पहिले शक्तिपीठ कोल्हापूर येथे आहे. हे पूर्ण शक्तिपीठांपैकी एक असून या मंदिराचे बांधकाम कोणी केलं, याबाबत अद्याप कोणतीही ठोस माहिती उपलब्ध नाही. काही संशोधकांनी केलेल्या संशोधनातून असा निष्कर्ष काढला की, शिलाहार राजवटीपूर्वी कार्हारक (सध्याचे कराड) या प्रांतातील सिंध वंशातील राजाने हे मंदिर बांधले असावे. या मंदिराच्या मुख्य वास्तूचे दोन मजले आहेत. या मंदिराचे संपूर्ण बांधकाम कोल्हापूरच्या आजुबाजूला मिळणाऱ्या काळ्या दगडामध्ये करण्यात आलेले आहे. हे मंदिर पश्चीमाभूख असून याच्या प्रवेशद्वाराजवळ नगरखाना देखील आहे.

या मंदिरातील महालक्ष्माची मूर्ती १.२२ मीटर उंच असून ०.९१ मीटर उंच दगडावर ठेवण्यात आली आहे. या मंदिरामध्ये गरुड मंडप इत्यादी कोरीव केलेल्या कलाकृती आहेत.

कधीकाळी मोगलांनी या देवळाचा विध्वंस केला तेव्हा देवीच्या पुजाऱ्यांनी अनेक वर्ष ही मूर्ती लपवून ठेवली होती असे म्हणतात. पुढे संभाजी महाराज यांच्या कारकिर्दीत मंदिराचे पुनर्जिवन जीवन करण्यात आले. (सतराशे १५ ते सतराशे २२ या काळात) महालक्ष्मी हे जागृत देवस्थान त्यामुळे बाळाजी बाजीराव पेशव्यांची बायको गोपिकाबाई हिने नवस फेडण्यासाठी जवळपास पाव किलो वजनाचे सोन्याचे चार चूडे वाहिल्याचा उल्लेख सापडतो. शुक्रवार मंगळवार व अश्विन कार्तिक मार्गशीर्ष माघ पौर्णिमेस पालखी निघते. नवरात्रात नऊ दिवस देवीची वाहन पूजा बांधतात. अष्टमीला नगरप्रदक्षिणा होते. ३१ जानेवारी आणि ९ नोव्हेंबर रोजी सूर्याची किरणे दरवाजा तून थेट महालक्ष्मीच्या पायावर पडतात १ फेब्रुवारी आणि दहा नोव्हेंबर रोजी ही किरणे देवीच्या छातीपर्यंत पोहोचतात व २ फेब्रुवारी आणि ११ नोव्हेंबर रोजी मावळत्या सूर्याची किरणे देवीच्या पूर्ण अंगावर पडतात. या सोहळ्याला महालक्ष्मीचा किरणोत्सव म्हणतात. हा उत्सव मोठ्या उत्साहात पार पाडला जातो. कोल्हापूरला भक्तांसाठी महालक्ष्मी धर्मशाळा आहे. तसेच मंदिराच्या जवळपास तसेच गावात राहण्याची जेवण्याची उत्तम व्यवस्था आहे. महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाचे रेस्ट हाऊस आहे. रेल्वे व बस लक्झरी सेवा भरपूर आहे.

**२) श्री क्षेत्र तुळजापूर, तुळजाभवानी :-**

शक्तिदेवतेच्या पीठापैकी साडे तीन पीठे महाराष्ट्रात आहे. त्यातील श्री क्षेत्र तुळजापूर हे पूर्ण व आद्यपीठ मानले जाते.

महाराष्ट्रातील उस्मानाबाद जिल्ह्यात वसलेले तुळजापूर हे महत्वाचे तीर्थक्षेत्र असून त्याठिकाणी तुळजाभवानी देवीचे प्राचीन मंदिर आहे. स्कंद पुराणातील सह्याद्री विभागात या देवतेची कथा आहे. कृतयुग युगात जेव्हा ऋषी कर्दमाची पत्नी अनुभूती ध्यान करत होती.

तेव्हा कुकर राक्षसाने तिला मारण्याचा प्रयत्न केला. तेव्हा तिला स्वत: ला त्या राक्षसापासून वाचवण्यासाठी तिने भगवती देवीचा धावा केला.




त्यावेळी देवी भगवती प्रकटली आणि त्याच्याशी लढाई करून त्या राक्षसाला ठार मारले.

त्यानंतर अनुभूतीच्या विनंतीमुळे देवी डोंगरावर राहण्यास तयार झाली. या देवीला तुर्जा-तुळजा (भवानी) असेही म्हटले जाते. या देवीचे जे भक्त तिचा धावा करतात, त्यांची इच्छा देवी पूर्ण करते.

देवीचे मंदिर बालाघाटावरील एक डोंगरमथ्यावर आहे मंदिराच्या काही भागांची बांधणी हेमाडपंती आहे.

महाराष्ट्रातील या देवतांना विशेष महत्त्व आहे आणि नवरात्रीचा उत्सवही जरी नऊ दिवसांचा असला तरी तुळजापुरात, हा उत्सव एकवीस दिवस चालतो. तुळजाभवानी दसरा महोत्सवात देवीची आकर्षक अलंकार पूजा असते.

तुळजाभवानी देवीच्या आशीर्वादाने शिवाजी महाराजांना स्वराज्य स्थापनेची प्रेरणा मिळाली होती. देवीने महाराजांना दृष्टांत देऊन महाराष्ट्रावरील दुष्टचक्राचे निवारण करण्यासाठी भवानी तलवार दिली होती. अशी आख्यायिका आहे. महाराजांनी देवीला कुलस्वामिनी मानून तिची प्रतापगडावर प्रतिष्ठापना केली होती. नवरात्रात तुळजापुरला यात्रा भरते. तुळजापूर उस्मानाबाद अंतर बावीस किलोमीटर आहे सोलापूर तुळजापूर ४५ किलोमीटर सोलापूर उस्मानाबाद औरंगाबाद जळगाव मुंबई पुणे कोल्हापूर बसची रेल्वेची सोय आहे .

**३) श्री रेणुकादेवी, माहूर :-**

देवीच्या पूर्ण शक्तीपीठांपैकी माहूरची देवी रेणुकामातेचे माहुरगड एक पीठ आहे. तिला श्री परशुरामाची आई म्हणून ओळखली जाते. असे म्हणतात की हे मंदिर तेराव्या शतकात देवगिरीच्या यादव राजाने बांधले आहे. माहूर येथील किल्ल्यात देवीच्या मंदिरासह इतर देवांची देखील मंदिरं आहेत. त्यामध्ये परशुराम मंदिर, दत्तात्रय मंदिर, अनसूया मंदिर, कालिकामाता मंदिर, यांसारख्या मंदिरांचा समावेश आहे. रामगड किल्ला हा माहूरच्या जवळपास आहे आणि त्यामध्ये सुंदर कोरीव काम केलेल्या लेणी देखील आहेत.

जमदग्नी ऋषीं यांचेकडे मनोकामना पूर्ण करणारी कामधेनु होती. जमदग्नी ऋषी हे रेणुका मातेचे पती. राजा सहस्त्रार्जुन याला या कामधेनूचा मोह झाला .त्याने जमदग्नी ऋषीं कडे तिची मागणी केली मात्र त्यांनी ती नाकारली, तेव्हा परशुराम हा जमदग्नी यांचा पुत्र तेथे नव्हता, हे पाहून आश्रमात हल्ला केला व जमदग्नीना ठार केले. कामधेनुला हिरावून नेले. परशुरामाला हा प्रकार कळल्यावर त्यांनी क्षत्रियांचा नायनाट करण्याची प्रतिज्ञा केली. त्याच्या अंत्यसंस्कारासाठी परशुरामाने रेणुका व जमदग्नी यांचे पार्थिव पाळण्यात बसून माहूर गडावर आला. तेथेच श्री दत्तात्रयांनी जमदग्नी वर अंत्यसंस्कार करण्याचे सांगितले. त्याच वेळी रेणुका सती गेली. परशुराम आईच्या विरहाने दुःखी झाला. तोच आकाशवाणी होऊन तुझी आई जमिनीतून वर येईल तू डोळे बंद कर डोळे उघडू नको. परंतु परशुरामाची उत्सुकता शिगेला पोहोचली डोळे उघडले. तोपर्यंत रेणुका मातेचे मुख वर आले होते. हीच तांदळा स्वरूपातली मुख असलेले माहूरची रेणुका माता होय. परशुरामाला या डोंगरावर मातेचे दर्शन झाले म्हणून याला मातापूर असेही म्हणतात.

माहूर गडावर नवरात्र उत्सव, कोजागिरी पौर्णिमा, दिवाळी, शाकंभरी नवरात्र, चंपाषष्टी, मकर संक्रांत, होळी, असे सण साजरे करतात. नवरात्रातील ललिता पंचमीला देवीची अलंकार पूजा केली जाते. मंदिर परिसरात परशुरामाचे मंदिर आहे.

गडावरील मंदिरात जाण्यासाठी दोनशे चाळीस दगडी पायऱ्या आहेत. तसेच वयस्कर मंडळी साठी डोली ही उपलब्ध असते.. अगदी रेणुका मातेच्या मंदिराच्या पर्यंत ते सोडतात. त्यामुळे दर्शन सहज संस्थेने घेता येते.आता तिथेही रोपेच्या कामाची सुरुवात झाली आहे.

महाराष्ट्रातील अनेक कुटुंबाची ही कुलदेवता आहे त्यामुळे वर्षा दोन वर्षातून दर्शनासाठी ही मंडळी येत असतात.

माहुर हे ठिकाण नांदेड जिल्ह्याच्या किनवट तालुक्यामध्ये आहे. अकोला, अमरावती, भुसावळ, पुसद, इथून बसेस उपलब्ध आहेत. या ठिकाणी भक्त निवास खाजगी लॉजिंग बोर्डिंग, बुलढाणा अर्बन बँकेचे रिसॉर्ट आहे. गेल्या काही वर्षात इथे खूप सुधारणा झालेल्या आहेत तसेच थोड्याच काळात रोपवे चीही सुविधा होणार आहे.

**४) श्री सप्तशृंगीदेवी, वणी :-**

साडेतीन शक्तीपीठांपैकी अर्धा शक्तीपीठाचा मान हा संप्तश्रुंगीदेवीचा आहे. येथे महाकाली, महालक्ष्मी आणि महासरस्वती या तिघींचेही हे एकच रूप आहे, असं मानण्यात येतं. पृथ्वीतलावर जंगदंबेची वेगवेगळी रूपं आहेत. त्यापैकी सप्तशृंगीदेवीचे रूप या तीन देवींचे एक रूप आहे. शुंभनिशुंभ आणि महिषासुर या राक्षसांचा वध केल्यानंतर देवी येथे तप आणि साधना करायला राहत होती. अशी आख्यायीका सांगण्यात येते. सह्याद्रीच्या उंच पर्वतरांगांमध्ये सात शिखरं आहेत. त्यावरूनच या ठिकाणाचे नाव सप्तशृंगी गड ठेवण्यात आले आहे. हिंदू पंचांगनुसार प्रत्येक नवरात्र आणि चैत्र महिन्यामध्ये येथे उत्सव भरवण्यात येतो.

सप्तशृंगीदेवी नाशिकपासून ६५ किलोमीटरवरील ४८०० फूट उंचीवरील सप्तशृंग गडावर वसलेली आहे. या देवीच्या मुर्तीविषयी देखील एक अख्यायिका सांगण्यात येत ती म्हणजे, एका धनगराला येथे एक मधमाशांचे पोळं दिसलं होतं. त्या धनगराने ते पोळं काठीच्या सहाय्याने काढण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी त्या काठिला शेंदूर लागला. त्याने पोळे काढल्यानंतर त्याला तिथे देवीची मूर्ती सापडली. हे मंदिर डोंगराची कपार खोदून तयार करण्यात आलेले आहे. यामध्ये महिरपीत देवीची आठ फूटाची मूर्ती अठरा भुजा मूर्ती आहे. मूर्ती शेंदूरलेपन, रक्तवर्ण असून डोळे टपोरे आहेत. यामुळे देवीचं रूप तेजस्वी दिसतं. त्याचप्रमाणे देवीचे सर्व हात एकमेकांना लागून आहेत. सर्व देवांनी महिषासुरासारख्या राक्षसाचा नाश करण्यासाठी देवीला शस्त्रही दिली आहेत.

या देवी मध्ये महासरस्वती महालक्ष्मी महाकाली या आहेत. त्रिगुणात्मक स्वरूप आहे. याच गडावर मच्छिंद्रनाथ यांना देवीने शाबरी विद्याचे धडे दिले होते, त्यांची ही समाधी गडावर आहे. ज्ञानेश्वरांची ही कुलस्वामिनी आहे. त्यांचे मोठे बंधू निवृत्तीनाथ हे समाधी घेण्यापूर्वी वणी गडावर आले होते व देवी च्या आदेशानुसार त्रंबकेश्वर येथे समाधि घेतली. नवनाथांची शाबरी विद्या या देवीची देणगी आहे. मार्कंडेय ऋषींनी या देवीची स्थापना केली कशी अख्यायिका आहे.

आता सप्तशृंगी गडावर भोजन निवास याची उत्तम व्यवस्था आहे. भरपूर लॉज, तसेच निवासाची सोय आहे. दर्शनाला जाण्यासाठी रोप-वे ही आहे.

अशा या देवीच्या साडेतीन शक्तिपीठाला अनेक भाविक नवरात्रात दर्शनाला जात असतात.

*।।जय श्री महालक्ष्मीदेवी।।*
*।।जय श्री रेणुका माता ।।*
*।।जय श्री तुळजाभवानी।।*
*।।जय श्री सप्तशृंगी निवासिनी।।*

**नवरात्री उत्सवाच्या शुभेच्छा...**

# शासकीय ग्रामीण रुग्णालय तलासरी परिसरात स्वच्छता अभियान संपन्न

**अक्षराज : हरी कापसे**

**दि.०४, तलासरी :** लालबहादुर शास्त्री यांच्या जयंती निमित्ताने शासकीय ग्रामीण रुग्णालयात स्वच्छता अभियान अंतर्गत स्वच्छता करण्यात आली. आज सकाळी१०वा.शासकिय ग्रामीण रुग्णालय परिसरात आवार रुग्णोपचार विभाग, आदि स्थानातुन प्लास्टिक कचरा बाटल्या काच आणि लहान-मोठी झुडपं पालापाचोळा यांचे वीस गोण्या मध्ये भरून कचराकुंडी मध्ये टाकण्यात आला व सर्व परिसर झाडून साफ करण्यात आले. याप्रकारे स्वच्छता अभियान राबविले



गेले. याप्रसंगी तलासरी लोक प्रतिनिधि जि.प.सदस्य बोदले मैडम, ग्राम पंचायत सदस्य विजय बोदले, ठाकरे सर, वडवली शासकीय वस्तीगृहाच गावडे सर, शनवार साहेब यांनी या स्वच्छता केलेल्या उपक्रमाचे कौतुक केले. याप्रसंगी महाराष्ट्र प्रांतिक तैलिक सभेचे तलासरी तालुका अध्यक्ष संतोष पिंगळे, कु.श्रुति पिंगळे, कु प्रणाली शाहपुरे,मनोज ठाकुर तर विप्र परशुराम सेवा संघ तलासरी कडून प्रथमेश दुबे, अमित झा, राजन यादव, नीलेश कावले यांनी स्वच्छता कार्यक्रमात सक्रिय सहभाग घेतला. तालुका शासकीय रुग्णालयाचे मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ.भोये साहेब, महिला विभागाचे मुख्य डॉ. पाडवी ताई यानी मंडळाचे कौतुक केले.या स्वच्छता अभियान कार्यक्रमात प्रथमेश दुबे यांचे खूप मोलाचे मार्गदर्शन लाभले.

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## माणगांव ते किल्ले रायगड धावली लाल परी...




**अक्षराज : सुरज महाडिक**

**दि.०४, माणगांव :** रायगड जिल्ह्यातील महाड मतदारसंघाचे शिवसेना आमदार आणि शिवसेनेती वरिष्ठ नेते असल्याने भरत गोगावलेंची महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ म्हणजेच एसटी महामंडळाचं अध्यक्ष पदी निवड झाल्यावर त्यांनी रायगड वासियांच्या हिताचा मोठा निर्णय घेतला. माणगांव ते रायगड किल्ले दर्शनासाठी लोकांना सोयीचे व्हावे या करिता दैनंदिन बस सेवा सुरु केली. सदर बस ही रोज माणगांव ते किल्ले रायगड येथे ये-जा करणार आहे. सदर बस चे वेळापत्रक असे असेल. सकाळी ८.१० वा. माणगांव वरून सुटणार ते सकाळी ९.१० वा. किल्ले रायगड येथे पोहोचणार. दुपारी १.१५ वा. माणगांव वरून सुटणार ते दुपारी २.१५ वा. किल्ले रायगड येथे पोहोचणार. रात्री ७.१० वा. माणगांव वरून सुटणार ते रात्री ८.१० वा. किल्ले रायगड येथे पोहोचणार. या सुविधेमुळे माणगांव ते किल्ले रायगड रस्त्यालगतच्या गावांचा प्रवासाचा प्रश्न मार्गी लागला. रस्त्यालगत असणाऱ्या अनेक खेड्याना याचा फायदा झाला असे बोलले जात आहे. दिनांक ३ ऑक्टोबर २०२४, सकाळी ०८.१० वा. च्या सुमारास बस चालक महेश अमृत पवार यांच्या समवेत पहिली बस या रस्त्यावरून धावली. या प्रवासाचा सर्व प्रवाश्यांनी लाभ घेतला. या प्रसंगाने माणगांवकरांचे स्वप्न पूर्ण झाले.

## नायगाव येथे दुर्गा मातेचे आगमन

**अक्षराज : दशरथ राऊत**

**दि.३, खंडाळा :** नायगाव (ता.खंडाळा) सावित्रीबाई फुले यांच्या जन्मभूमी गावामध्ये दुर्गा माता की जय आशा घोषणा देत म्हावशी गावचे बाळसिद्धनाथ ढोल लेझीम मंडळ ढोल ताशाच्या गजरात आनंदी वातावरणात दुर्गा माता देवीची मोठ्या उत्साहात वाजत गाजत आगमन केले.

नायगावकरांच्या तसेच दुर्गामाता भक्तांच्या विनंतीला मान देऊन म्हावशी गावाला दुर्गामाता आगमनाच्या मिरवणूक प्रसंगी बोलवण्यात आले. यावेळी बंडू(तात्या) राऊत, विश्वास माळी, विठ्ठल राऊत, आकाश राऊत, भरत वेदपाठक, राहुल शेंडगे आणि बाळसिद्धनाथ ढोल लेझीम मंडळाचे खेळ गडी उपस्थित राहून दुर्गा माता उत्सवाचे जंगी स्वागत केले.नायगाव मधील दुर्गा मात भक्तांचा तसेच लहान मुले, महिला, युवक, युवती मोठ्या प्रमाणात उत्साह पाहावयास मिळाला गुरुवारी घटस्थापने दिवशी दुर्गा माता मूर्तीचे प्रतिष्ठापना करून नवरात्री उत्सवाला सुरुवात केली.

## काष्टी येथे नवरात्र उत्सवाला प्रारंभ



**अक्षराज : रोहन रंधवे**

**दि.०३, श्रीगोंदा :** सालाबाद प्रमाणे यावर्षी पै.अजय रंधवे यांच्या मार्गदर्शनाखाली म हाबली मित्र मंडळ पुरस्कृत जय तुळजाभवानी महिला मंडळाच्या वतीने भाजपचे युवा मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष विक्रमसिंह पाचपुते यांच्या शुभहस्ते घटस्थापना व मूर्ती प्राणप्रतिष्ठापना करण्यात आली. मंडळाच्या वतीने राशीन ते काष्टी ज्योत दौडीचे आयोजन करण्यात आले होते. ९ दिवस विविध उपक्रम व विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असल्याचे मंडळाच्या महिला पदाधिकाऱ्यांनी सांगितले. यावेळी मार्केट कमिटीचे मा.सभापती वैभव पाचपुते, माजी सरपंच राजेंद्र पाचपुते, काष्टी सोसायटीचे व्हा.चेअरमन शहाजी पाटील भोसले, महादेवराव मोरे, केशव पाचपुते, प्रा.सागर पाचपुते, माऊली पाचपुते, सुहास पाचपुते, संदीप कोकाटे, गणेश गायकवाड, प्रा.बंटी रंधवे, हनुमंत गायकवाड, प्रीतम मांडोत, मारुती रंधवे, भूषण रंधवे, सुनील माने, राजेंद्र रंधवे, मच्छिंद्र गायकवाड, मनोज शहाणे, योगेश मोढवे, विठ्ठल पवार, रोहन मुनोत, अनिल पठारे, सुनील दळवी, सुरेश गायकवाड, वनराज कोकाटे, किरण कुसाळकर, मंडळाचे सर्व कार्यकर्ते व महिला भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पतंजली योग समिती व जिव्हाळा ग्रुपवतीने स्वप्निल जाधव यांचा सत्कार



**अक्षराज : जयराम देमगुंडे**

**दि.०४, उदगीर (लातूर) :** आज **(दि.०४)** वाढवणा येथील स्वप्नील जाधव यांनी विरुंगुळा केंद्राला सदिच्छा भेट दिली व विधानसभेला आमदारकी साठी उभे राहणाचा त्यांचा मनोदय त्यानी व्यक्त केला. यावेळी जेष्ठ नागरिक संघ, पतंजली योग समिती, जिव्हा ळा ग्रुप यांच्या वतीने त्यांचा शाल, पुष्प व ग्रंथ देऊन सन्मान करण्यात आला. याप्रसंगी प्राचार्य शिवाजी सगर, प्रा.श्रीराम चामले, ग्रंथ मित्र बलसुरकर, प्रा.मधवरे, जाधव मुरलीधर यांनी त्यांच्या कार्याला शुभेच्छा दिल्या. यावेळी हकीम साहेब, पत्तेवार सर, मालेवाडीकर, नळगीरकर सर, मनोहर कुलकर्णी सर, बेद्रे सर, मुंदडा शेटजी, धुळप्पा सर,अनेक योगसाधक, जेष्ठ नागरिक उपस्थित होते.

## वाखारी येथील शेतकऱ्याचा अज्ञात वाहनाच्या धडकेत मृत्यू

**अक्षराज : निवृत्ती शिंदे**

**दि.०४, नांदगाव(नाशिक) :** नांदगाव मालेगाव रोडवर गुरुवार दि.३ आक्टोंबर रोजी वाखारी गावातील रहिवासी, निवृत्ती झेला चव्हाण वय (५० वर्ष) हे पहाटे पाच वाजेच्या सुमारास प्रांतविधीसाठी बाहेर पडले असताना नांदगाव कडून मालेगाव कडे जाणाऱ्या अज्ञात ट्रकने त्यांना धडकून त्या ठिकाणावरून अंधाराचा फायदा घेत पोबारा केला, धडकेत त्यांचा जागीच मृत्यू झाला असल्याचे समजते, पहाटे अंधार असल्यामुळे स्थानिक नागरिकांना घटनेबाबत लवकर समजू शकले नाही, सकाळ झाल्यावर काही नागरिकांनी बघितल्यावर घटनेची वार्ता वाऱ्यासारखी पूर्ण गावभर पसरली, घटनेबाबत वाखारी गाव -परिसरात हळहळ व्यक्ती केली जात आहे.

## तरुणाईला दांडियाचे वेध! युवतींमध्ये यंदा पुष्पा अन् झमकुडी घागऱ्यांचा ट्रेण्ड



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०४, शिरपूर (धुळे) :** देवीची आराधना करण्याचा काळ म्हणजे नवरात्रोत्सव होय. तरुणाईला वेध लागले ते रंगीलो दांडिया उत्सवाचे. यासाठी खास परिधान केले जाणारे नवीन घागऱ्यात यंदा 'पुष्पा' व 'झमकुडी' घागऱ्याचा ट्रेण्ड असून, युवतींमध्ये त्याची क्रेझ आहे.

गुजरातहून तीन हजार नवीन घागरे शहरात दाखलगुजरात राज्यातील अहमदाबाद, सुरत, राजकोट येथून नवीन तीन हजार घागरे शहरात दाखल झाले आहेत. हे घागरे विक्रीसाठी उपलब्ध आहेत. याशिवाय भाड्याने घागरे घेण्याची परंपरा कायम असून, यासाठी सात हजार घागरे आधीचे आहेच.

> शेवटच्या चार दिवसात दररोज दीड हजार घागरे जातात भाड्यानेनवरात्रोत्सात सुरुवातीचे पाच दिवस शहरात २०० ते २५० घागरे भाड्याने जातात, तर शेवटचे चार दिवस हजार ते दीड हजारपेक्षा अधिक घागरे भाड्याने जातात. भाड्याने देण्यात येणारे घागरे त्यांची किंमत दोन हजार ते सात हजार रुपयांदरम्यान असते. हे घागरे डिझाइनर असतात. हे घागरे ५०० ते २ हजार रुपये भाड्याने मिळतात.-
>
> **प्रविण भामरे, व्यापारी त-हाडी**

१२ मीटर घेर असलेला पुष्पा घागराबाजारात आलेल्या पुष्पा घागराचे वैशिष्ट्य असे आहे की, याचा घेर १२ मीटरचा आहे. यास हाफ-हाफ घागरा असेही म्हणतात. कारण, यात घागऱ्याची अर्धी बाजू डिझाईनर तर अर्धी बाजू प्लेन असते.

आडव्या कळीचा झमकुडी घागरा'झमकुडी' घागऱ्याचा घेर ७ मीटर असतो. घागरा, सिव्हलेस ब्लाउज त्यावर फुल सिव्हलेस जॉकेट असते. कॉटन कपड्यावर वर्क केलेले असते. याचे वैशिष्ट्य म्हणजे इतर घागरे उभ्या कळीचे असतात, तर झमकुडी घागऱ्याला आडव्या कळी असतात.

पाँचो कफतान घागराज्या म हिला, तरुणी लठ्ठ आहे. त्यांच्यासाठी 'पाँचो कफतान' घागरा आला आहे. प्लेन घागरा, खाली बॉडर (आजरग, पटोला प्रिंटची बॉडर) असलेला घागरा शोभून दिसतो. या घागऱ्यात लठ्ठपणा दिसून येत नाही.

## अनधिकृत बांधकामावर वाशी विभागामार्फत कारवाई



**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.०४, वाशी (नवी मुंबई) :** महापालिकेच्या अतिक्रमण विभागाच्या वतीने नोटीस देऊनही संबंधितांनी नोटिशीची दखल न घेतल्यामुळे अतिक्रमण विभागामार्फत आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या निर्दे शानुसार व डॉ. राहुल गेठे यांच्या मार्गदर्शनाखाली अतिक्रमण विभागाने वाशी विभागात पाडकामाची कारवाई करण्यात आली.

वाशी विभाग अंतर्गत शारजान गुलाब मुलानी, घर क्र. १ व २, सेक्टर- १५, वाशी, नवी मुंबई येथे महानगरपालिकेची कोणतीही परवानगी न घेता अनधिकृतपणे बांधकाम सुरु होते. सदर अनधिकृत बांधकामास वाशी विभागामार्फत महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ मधील कलम ५४ अन्वये नोटीस बजाविण्यात आलेली होती. संबंधितांनी केलेले अनधिकृत बांधकाम स्वतःहून हटविणे आवश्यक होते. परंतु त्यांनी अनधिकृत केलेले बांधकाम हटविले नाही.

सदर अनधिकृत बांधकामावर वाशी विभागा मार्फत तोडक मोहिमचे आयोजन करुन, अनधिकृत बांधकाम निष्कासित करण्यात आले. आयुक्त डॉ. कैलाश शिंदे यांचे आदेशान्वये व उपायुक्त डॉ. राहुल गेठे यांच्या मार्गदर्शनानुसार सी विभाग कार्यालयाचे सहायक आयुक्त सागर मोरे यांच्या नियंत्रणाखाली सदरचे अनधिकृत बांधकाम हटविण्यात आले. या धडक मोहिमे साठी अतिक्रमण विभागाचे अधिकारी/ कर्मचारी उपस्थित होते. या धडक मोहिमेसाठी एकूण ११ मजुर, १ जेसीबी, १ इलेक्ट्रिकल हॅमर व १ गॅस कटर यांचा वापर करुन अनधिकृत बांधकाम निष्कासीत करण्यात आले आहे.

## खरोळा फाटा ते पानगाव रस्ता होण्याच्या आशा झाल्या पल्लवीत...



**अक्षराज :उमेश जोशी**

**दि.०४, रेणापूर :** खरोळा फाटा ते पानगाव रखडलेला राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ३६१ हा गेल्या ४ वर्षा पासून रखडलेला आहे रखडलेला राष्ट्रीय महाम ार्गा मुळे पानगाव व पानगाव परिसरात तील व्यापारी, नागरिक, विध्यार्थी यांना त्रास सहन करावा लागत आहे. त्या मुळे रखडलेला राष्ट्रीय महामार्ग काम लवकरात लवकर सुरु करा या मागणी साठी पानगाव चे माजी सरपंच व पानगाव येथील नागरिक १५ ऑगोस्ट पासून खरोळा फाटा या ठिकाणी साखळी उपोषणाला बसले आहेत. दीड महिन्या पासून हे साखळी उपोषण सुरु आहे.या उपोषणला मुरढव, घनसरगाव, हनुमंतवाडी, फवाडेवाडी, रामवाडी, तळणी मोहगाव पानगाव येथील नगरिकांनी पाठिंबा दिला आहे. मुरढव तळणी मोहगाव हनुमंत वाडी येथील नागीरकांनी रस्ता रोको करून तसेच पानगाव हे गाव बंद ठेऊन लोकांनी या उपोषणाला वेळो वेळी पाठिंबा दिला आहे.

> **रखडलेला राष्ट्रीय महामार्ग कामासाठी पाठपुरवा सूरुच...**
>
> खरोळा फाटा ते पानगाव रखडलेला महामार्ग काम सुरु करण्यासाठी माझा केद्रीय रस्ते विकास मंत्री नितीन गडकरी यांच्या कडे पाठपुरवा सूरु आहे. रखडलेल्या रस्ता बाबत मी जिल्हाअधिकारी याच्यासोबत बैठक घेऊन या बैठकीला संबंधीत गुत्तेदार राष्ट्रीय महामार्गचे अधिकारी यांच्या सोबत हि चर्चा करण्यात आली. रखडलेल्या रस्तासाठी रेणापूर फाटा येथे उपोषण सूरु असल्याचीही फोन द्वारे संपर्क करून माहिती दिली. रखडलेल्या रस्ताच्या काम साठी माझा पाठपुरवा सूरुच आहे.
>
> **- धीरज देशमुख, आमदार लातूर ग्रामीण**

रखडलेला राष्ट्रीय महामार्ग मुळे पानगाव मधील व्यापार पूर्ण पणे बंद पडला आहे पानगाव हे २५ हजार लोकसंख्या असलेले रेणापूर तालुक्यातील सर्वात मोठे गाव आहे. आजूबाजूला १३ वाड्या आणि १ पानगाव असा १३ गावाचा व्यापाराचे हे ठिकाण आहे रेणापूर तालुक्यातील सर्वात जुने निजाम कालीन रेल्वे स्टेशन याच टिकाणी आहे परंतु या गावात येण्या साठी केवळ रस्ता नसल्या मुळे गावाचा व्यापार पूर्ण पणे बंद पडण्याच्या वाटेवर आहे.

१५ ऑगोस्ट पासून रखडलेला खरोळा फाटा या ठिकाणी सुरु असेलेल्या उपोषणाला ग्रामीण चे आमदार मा धीरज देशमुख व लातूर लोकसभेचे खासदार मा शिवाजीराव काळगे यांनी भेटी दिल्या मुळे.व रस्ता लगतच्या कामाला सुरु झाल्या मुळे लोकांच्या रस्ता होण्याच्या अशा ह्या पल्लवीत झाल्या आहेत.

## राज्य मंत्रिमंडळ बैठकीत 'लोकराज्य' चे प्रकाशन शासनाच्या निर्णयांची समग्र माहिती



**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.०४, ठाणे :** लोकराज्य जुलै-ऑगस्ट २०२४ अंकाचे आज राज्य मंत्रिमंडळ बैठकीत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले. मुख्य सचिव सुजाता सौनिक, मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव आणि माहिती व जनसंपर्क महासंचालक ब्रिजेश सिंह यांची उपस्थिती होती.

या अंकामध्ये शासनाच्या दोन वर्षांमध्ये घेण्यात आलेल्या निर्णयांचा समग्र आढावा घेण्यात आला आहे. या अंकात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह सर्व मंत्रिमंडळातील सदस्यांचे मनोगत पर लेखांचा समावेश करण्यात आला आहे.

या अंकामध्ये शासनाने आतापर्यंत घेतलेला निर्णय यांचा थोडक्यात आढावा घेण्यात आला आहे. तसेच या अंकामध्ये मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या शुभारंभ कार्यक्रमाचा आढावा आणि महिला लाभार्थ्यांच्या प्रतिक्रियांचा समावेश करण्यात आला आहे. विविध विभागांच्या निर्णयांचा या अंकात समावेश असल्याबद्दल मंत्र्यांनी समाधान व्यक्त केले.

## नमुंमपा आरोग्य विभागाची विशेष धुरीकरण मोहीम

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.०४, नवी मुंबई :** महानगरपालिका कार्यक्षेत्रात डासांच्या प्रादुर्भावावर नियंत्रण ठेवण्याकरिता नियमित साप्ताहिक वेळापत्रकानुसार डासअळी नाशक फवारणी व रासायनिक धुरीकरण कार्यक्रम प्रभावीपणे राबविला जातो. यादृष्टीने नमुंमपा कार्यक्षेत्रात डास प्रादुर्भावावर नियंत्रण ठेवण्याकरिता दि.०५ ते ११ ऑक्टोबर २०२४ या कालावधीत विशेष धुरीकरण मोहिम राबविण्यात येणार आहे. या मोहीमेम ध्ये प्रत्येक नागरी प्राथमिक आरोग्य केंद्राच्या संपूर्ण कार्यक्षेत्रात एकाच दिवशी रासायनिक धुरीकरण करण्यात येणार आहे. दि.०५ ऑक्टोबर रोजी सीबीडी, वाशीगाव, इंदिरानगर, राबाडा नागरी प्राथमिक आरोग्य केंद्राच्या परिसरात, दि. ७ ऑक्टोबर रोजी से-४८ नेरूळ, कुकशेत, सानपाडा, खैरणे, दिघा नागरी प्राथमिक आरोग्य केंद्राच्या कार्यक्षेत्रात, तसेच ८ ऑक्टोबर रोजी करावे, नेरुळ-२, तुर्भे, महापे, ऐरोली नागरी प्राथमिक आरोग्य केंद्राच्या कार्यक्षेत्रात रासायनिक धुरीकरण करण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे दि.०९ ऑक्टोबर रोजी शिरवणे, जुहुगाव, कातकरीपाडा, चिंचपाडा तसेच १० ऑक्टोबर रोजी नेरुळ-१, पावणे, घणसोली, इलठणपाडा आणि दि. ११ ऑक्टोबर रोजी नोसील नाका नागरी प्राथमि क आरोग्य केंद्राच्या कार्यक्षेत्रात रासायनिक धुरीकरण केले जाईल. तरी नागरिकांनी सदर मोहिम यशस्वी करण्यासाठी आपल्या कार्यक्षेत्रात येणाऱ्या नमुंमपा आरोग्य कर्मचाऱ्यांना सहकार्य करावे व धुरीकरणाविषयी काही तक्रारी असल्यास नजीकच्या नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रास संपर्क साधावा असे आवाहन नमुंमपा आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांचेमार्फत करण्यात येत आहे.

# टाकळी ढोकेश्वर गटातील ३० लक्ष रुपयांच्या विविध विकासकामांचे भूमिपूजन संपन्न

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.४, पारनेर (अ.नगर) :** महाराष्ट्र राज्याचे ग्रामविकास मंत्री मा.नामदार श्री गिरीश भाऊ महाजन यांच्या माध्यमातून मंजूर करण्यात आलेल्या विकासकाम ांपैकी आज शुक्रवार दि.०४ ऑक्टोबर रोजी टाकळी ढोकेश्वर गटातील विविध विकासकामांचा भूमिपूजन सोहळा संपन्न झाला असल्याची माहिती भाजपच्या प्रदेश कार्यकारिणीचे विद्यमान सदस्य विश्वनाथ दादा कोरडे यांनी दिली.



यावेळी कोरडे जिल्हा परिषदेच्या बांधकाम समितीचे सभापती श्री काशिनाथ दाते सर, सिताराम खिलारी सर विश्वस्त अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज, खरेदी विक्री संघाचे चेअरमन श्री बाबासाहेब खिलारी, कर्जुले हर्या गावाचे माजी सरपंच साहेबराव वाफारे,बारा बलुतेदार संघटनेचे तालुकाध्यक्ष बाळासाहेब शिरतार, अप्पाभाऊ गोपाळे, नंदाताई शिंदे सरपंच सावरगाव, विलास झावरे म ाजी उपसभापती बाजार समिती, शिवाजी खिलारी माजी सरपंच टाकळी ढोकेश्वर, चेअरमन नारायण झावरे, अंजना बांडे जिल्हा सरचिटणीस महिला मोर्चा भाजपा, संजय उदावंत, प्रदीप गुगळे, कातालवेढे गावचे माजी सरपंच ठकाशेठ कडुस्कर, माजी सरपंच सुदाम गाजरे, रामदास गाजरे मा.चेअरमन, संभाजी भाईक, सुदाम जाधव मा.चेअरमन मांडवे खुर्द, श्रीरंग गागरे, बाळासाहेब जाधव, संपत गागरे, पांडुरंग जाधव, सचिन जाधव, संजय उदावंत,यांसह स्थानिक नागरिक मोठ्या संखेने उपस्थित होते. सबंधित भूमिपूजन करण्यात आलेल्या कामांमध्ये सावरगाव येथील रामोशी वस्ती करिताबांधण्यात येत असलेल्या पत्राशेडसाठी ८ लक्ष रुपये, मौजे काटळवेढे येथील काटेश्वर मंदिरासमोर पत्राशेड उभारणीसाठी ८ लक्ष रुपये, मांडवे खुर्द येथील दिल बादशहा देवस्थानच्या रस्ता कॉक्रिटीकरणासाठी ७ लक्ष रुपये तर टाकळी ढोकेश्वर येथील भैरवनाथ मंदिरासमोर सभामंडप बांधण्यासाठी ७ लक्ष रुपये या काम ांचा समावेश असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले आहे.

पुढे बोलताना कोरडे यांनी यावेळी सांगितले की, पक्षाच्या संघटनात्मक पदाच्या माध्यमातून जी-जी शक्य झाली ती कामे वरिष्ठांकडे पाठपुरावा करत करण्याचा मी सातत्याने प्रयत्न करत राहिल्यानेच आज तालुक्यात आपल्या माध्यमातून अब्जावधी रुपयांची विकासकामे उभी राहिली असून उद्याच्या काळात महाराष्ट्रात महायुतीचेच सरकार येणार असल्याने नागरिकांनी निधींच्या बाबतीत निश्चिंत राहावे.

# पारनेर तहसील कार्यालयातील त्या अधिकाऱ्यावर कारवाई व्हावी

## अन्याय निवारण निर्मूलन सेवा समितीचा आंदोलनाचा इशारा

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०४, अहमदनगर :** पारनेर तालुक्यातील म्हसणे सुलतानपूर येथील गट नंबर ३९ च्या अवैध गौण खनिज उत्खनन प्रकरणी ७२ लाखाची दंडात्मक नोटीस दाबणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची व त्याच जागेवर विनापरवाना तीन मजली इमारत बांधणाऱ्यांवर दंडात्म क कारवाई करण्याची मागणी अन्याय निवारण निर्मूलन सेवा समितीच्या वतीने जिल्हाधिकारी यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.



या प्रकरणी कारवाई न झाल्यास २१ ऑक्टोबर पासून संघटनेच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर बेमुदत ठिय्या आंदोलन करण्याचा इशारा जिल्हाध्यक्ष अरुण रोडे व पारनेर तालुकाध्यक्ष निवृत्ती कासुटे यांनी दिला आहे.

पारनेर तहसील कार्यालय अंतर्गत मौजे म्हसणे सुलतानपूर येथील गट नंबर ३९ मध्ये अनधिकृत रित्या गौण खनिज साठविल्याने पारनेर तहसील कार्यालय यांनी दिनांक १९ जून २०२३ रोजी कारवाई करुन संबंधितांना ७२ लाख ४५ हजार रुपयेची दंडात्मक नोटीस काढली होती. परंतु तहसील कार्यालयातील कर्मचारी अधिकारी यांनी समोरील व्यक्तींशी संगणमत करून त्या नोटीसा बाबत कुठलीही कारवाई न करता ती नोटीस कार्यालयातच दाबून ठेवल्याचा आरोप संघटनेच्या वतीने करण्यात आला आहे.

या प्रकरणात तहसील कार्यालयातील अधिकारी, कर्मचारी दोषी असल्याने आज अखेर उपविभागीय अधिकारी श्रीगोंदा-पारनेर कुठलीही कारवाई करू शकले नाही. राजकीय दबावापोटी आज अखेर कुठलीही कारवाई झाली नाही. सदरच्या गट नंबर ३९ मध्ये शेतीसाठी जागा खरेदी करण्यात आली होती. परंतु आज त्या प्लॉटमध्ये तीन मजली इमारत उभारण्यात आली आहे. तर इमारत बांधण्यासाठी कुठलीही परवानगी न घेता कुठलेही लेआऊट मंजूर नसताना, बांधकाम करण्यात आले आहे. सदरच्या बांधकामाचा सद्यस्थितीचा पंचनामा करून इमारत उभारणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई करण्याचे संघटनेच्या वतीने स्पष्ट करण्यात आले आहे.

# उद्या शालिनी ठाकरेंच्या हस्ते राज्यस्तरीय शिक्षक पुरस्काराचे वितरण

**अक्षराज : विकास सरवळे**

**दि.०४, पंढरपूर :** महाराष्ट्र नवनिम ाण शिक्षक व शिक्षकेत्तर सेनेच्या वतीने राज्यस्तरोय उपक्रमशिल संस्था, उपक्रमशिल शाळा, राज्यस्तरीय गुणवंत मुख्याध्यापक, गुणवंत शिक्षक आणि गुणवंत शिक्षकेत्तर कर्मचारी अशा ३२ जणांची पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे.

रविवार, दिनांक ६ ऑक्टोबर रोजी दुपारी एक वाजता शेठ मोरारजी कानजी सभागृह-स्टेशन रोड पंढरपूर येथे महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे नेते सहकार सेनेचे राज्य अध्यक्ष दिलीप बापू धोत्रे यांच्या मार्गदर्शनाखाली महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या नेत्या शालिनीताई ठाकरे यांच्या हस्ते, आणि मनसे शिक्षक सेनेचे राज्याध्यक्ष संजय चित्रे, मनसे नेते राजा चौगुले, मनसे नेते बाबू वागस्कर, पुणे शहर मनसे महिला अध्यक्ष वनिता वागस्कर, मनसे शिक्षक सेनेचे प्रदेश सरचिटणीस जयवंत हक्के, उपाध्यक्ष संतोषकुमार घोडके, मनसे लोकसभेचे सोलापूर जिल्ह्याचे अध्यक्ष प्रशांत इंगळे, मनसे जिल्हाध्यक्ष प्रशांत गिड्डे यांच्या प्रमुख उपस्थितीत या पुरस्काराचे वितरण सन्मानपूर्वक केले जाणार आहे. अशी माहिती महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे जिल्हाध्यक्ष व निवड समितीचे सदस्य विनायक महिंद्रकर यांनी दिली. राज्यातील संस्था आणि शाळा पुरस्कारासाठी छत्रपती संभाजीनगर येथील बालविकास जनकल्याण व सांस्कृतिक सेवाभावी शिक्षण प्रसारक मंडळ, नाशिक येथील मराठा विद्या प्रसारक समाज,



सोलापुरातील शेळगी येथील साईबाबा शिक्षण प्रसारक मंडळ, धुळे येथील प्राथमि क विद्यामंदिर, आणि कोल्हापूर येथील प्री प्रायमरी स्कूल या संस्था आणि शाळांना पुरस्कार जाहीर करण्यात आले आहेत.

राज्यस्तरीय शिक्षकेतर पुरस्कारासाठी शाळा आणि महाविद्यालयात काम करणारे कर्मचारी लातूर जिल्ह्यातील जवळा येथील समता माध्यमिक विद्यालयाचे पांडुरंग देडे, मंगळवेढा तालुक्यातील बालाजी नगर येथील कला आणि विज्ञान कनिष्ठ महाविद्यालयाचे श्रीकांत मेलगे, इचलकरंजी कलावंत म ळा येथील अनंतराव भिडे विद्यामंदिरचे बाळासाहेब मोकाशी, आणि सोलापुरातील शिवाजी मराठी विद्यालयातील प्रभाकर कारंडे यांची निवड करण्यात आली आहे.

राज्यस्तरीय गुणवंत मुख्याध्यापक पुरस्कारात पुणे येथील अरुणा चौधरी प्राथमिक विद्यलायतील मुख्याध्यापक हनुमंत बिनवडे, लातूर येथील जवाहर प्राथमिक शाळेचे प्रभाकर गोविंदवाड, पुण्याच्या डेक्कन जिमखाना येथील बाल शिक्षण मंदिरचे सुनीता चव्हाण, पालघर हमरापुर येथील इ एम ओ जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळेचे संजय पाटील, अहमदनगर पिसोरेखांड येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे सुरेंद्र हातवळणे, नंदुरबार येथील तलावडीचे अनुदानित माध्यमिक आश्रम शाळेचे प्रकाश साळुंखे, सोलापूर येथील एस व्ही सी एस हायस्कूल आणि कनिष्ठ महाविद्यालयाचे राम ेश्वर झाडे, रायगड जिल्ह्यातील वाकडी येथील अण्णासाहेब सहस्त्रबुद्धे अनुदानित आश्रम शाळेचे क्रांती पाटील, धाराशिव तामलवाडी येथील सरस्वती विद्यालयातील सुहास वडणे आणि सोलापूर जिल्ह्यातील पंढरपूर नगरपालिका प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक रामचंद्र बोडरे या मुख्याध्यापकांची गुणवंत पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे.

तर राज्यस्तरीय गुणवंत शिक्षक पुरस्कारासाठी लातूर जिल्ह्यातील हंगरूळ खुर्द येथील जिल्हा परिषद हायस्कूलचे प्रकाश जाधव, लातूर जिल्ह्यातील मंगरूळचे ज्ञानवर्धिनी विद्यालयातील हनुमंत केंद्रे, कोल्हापूर जिल्ह्यातील इचलकरंजीचे अरुण विद्या मंदिरचे प्रशांत गुरव, सोलापूर येथील शरद चंद्र पवार प्रशालेचे अविनाश आलदर, धुळे जिल्ह्यातील नकाने येथील कमलाबाई विसपुते प्राथमिक विद्यालयातील प्रवीण देवरे, पुणे येथील हुजूरपागा कात्रज प्राथमिक शाळेच्या प्रिया गोगावले, पुणे भोसरी येथील सेठ रामधारी रामचंद्र अग्रवाल प्राथमिक विद्यालयाचे दिनकर मुंडे, मुंबईतील गणेश नगर येथील एम पी एस गणेश नगर इंग्लिशचे श्रीमती वैशाली टंकसाळी, नाशिक बोकडदरे येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे प्रदीप देवरे, नंदुरबार तळोदा येथील श्री. एस.एल माळी जुनिअर कॉलेजचे प्रा.रेखा चव्हाण, जळगाव पाचोरा येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे पुष्पलता पाटील, सोलापूर येथील हनमगाव येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या मंजुषा कलशेट्टी, आणि सोलापूर जिल्ह्यातील मगरवाडीचे जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील अमर गोसावी या शिक्षकांची गुणवंत पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे.

राज्यभरातून आलेल्या या पुरस्कार निवडीसाठी माजी शिक्षण उपसंचालक प्रदीप मोरे, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे सहकुलासचिव शिवाजी शिंदे, सोलापूर जिल्ह्यातील मोहोळचे शिक्षण विस्तार अधिकारी मल्लिनाथ स्वामी, महाराष्ट्र साहित्य परिषद जुळे सोलापूर शाखेचे अध्यक्ष पद्माकर कुलकर्णी, सोलापूर लोकसभा म हाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष, व पुरस्कार निवड समितीचे सदस्य प्रशांत इंगळे, महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे जिल्हाध्यक्ष विनायक महिंद्रकर यांचा समावेश होता. या पत्रकार परिषदेला दिलीप बापू धोत्रे, जयवंत हक्के, संतोष घोडके, विनायक महिंद्रकर, प्रशांत इंगळे, विश्वास गजभार, अमर कुलकर्णी, जैनुद्दीन शेख, प्रकाश कोळी, अभि रंपुरे, वीरसंगाप्पा भोज आदींची उपस्थिती होती.

# सुभाषनगर संरक्षण भिंतीसाठी ३ कोटी मंजुर

**अक्षराज : मानसी कांबळे**

**दि.०४, खोपोली (रायगड) :** सुभाषनगर व काजुवाडी येथील धोकादायक दरडीभोवती संरक्षण भिंत उभारण्यात यावे. यासाठी मागील ३-४ वर्षापासून जेष्ठ पत्रकार कै.हनुमंत ओव्हाळ यांच्या नेतृत्वाखाली रायगड संघर्ष समिती, पोलीस मित्र संघटना व माजी नगरसेवक मंगेश दळवी सातत्याने पाठपुरावा करीत होते. मुख्यमंत्री कार्यालयासह खासदार, आमदार, जिल्हाधिकारी, तहसिलदार, खोपोली नगर परिषदेचे मुख्याधिकारी आदी विविध ठिकाणी निवेदन देण्यात आले होते. एवढेच नव्हे तर अनेक वेळा आंदोलन, उपोषण, रॅली, बैठका, झाल्या होत्या. अखेर या लढ्याला यश मिळाले असून सुभाषनगर व काजुवाडी संरक्षण भिंतीसाठी ३ कोटी ५० लाख रुपये निधी मंजुर झाला असुन लवकरच कामाला सुरूवात होणार आहे, अशी माहिती नगरसेवक मंगेश दळवी यांनी दिली. याबाबत बोलतांना खोपोली नगर परिषदेचे माजी नगरसेवक व गटनेते मंगेश दळवी म्हणाले की, सुभाषनगर लगत असलेल्या धोकादायक दरडीभोवती संरक्षक भिंत बांधण्यासाठी केंद्र सरकारकडून निधी मंजुर झाला आहे, ही खरंच आनंदाची बाब आहे. या कामासाठी ३ कोटी ५० लाख रूपयांचा निधी मंजुर झाला आहे, अशी माहिती कर्जत-खालापूर विधानसभेचे आ.महेंद्र थोरवे यांनी फोन करून दिली. आ. थोरवे यांनी सांगितले की, तुम्हाला आज लेटर पाठवून देतो. सदर कामाचा पाठपुरावा करण्यासाठी सुभाष नगर मधील जेष्ठ पत्रकार कै. हनुमंतराव ओव्हाळ, खलील सुर्वे, फिरोज पिंजारी, मानसी कांबळे, स्थानिक नगरसेवक, नगरसेविका तसेच शिवसेना खोपोली शहर प्रमुख संदीप पाटील व सर्व नगरसेवक यांची मेहनत आहे.

# थोडक्यात

## शिव नदी संवर्धन १३.१२ कोटी रूपयांचे प्रोजेक्टचे काम शुभारंभ



**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.०४, लासलगाव (नाशिक) :** मंत्री छगन भुजबळ यांच्या विशेष प्रयत्नांतून राज्य नदी संवर्धन योजना अंतर्गत लासलगांव येथील शिव नदी संवर्धन १३.१२ कोटी रूपयांचे विकास कामाचे उद्घाटन करण्यात आले. लासलगाव, ब्राह्मणगाव, निमगाव वाकडा या गावाच्या शिवेवरुन शिवनदी वाहते. शिवनदीत घाणीच्या साम्राज्यामुळे अक्षरश: कचराकुंडी झाली आहे.छगन भुजबळ यांच्या विशेष प्रयत्नांतून आजपासून शिव नदीचे जलद गतीने काम सुरू झाले आहे व नदीचा कचरा हा पोकलेन च्या साह्याने काढण्यात येत आहे. यामध्ये शिवनदी सुशोभीकरण काम हे लासलगाव पिंपळगाव नजीक शास्त्रीनगर बंधारा ते निमगाव वाकडा देवी मंदिर या परिसरातील शिवनेरी काठचा परिसर सुशोभीकरण, प्रामुख्याने घाट दुरुस्ती, काठावर असलेला कचरा डेपोला ५ फूट संरक्षण भिंत, दशक्रिया विधी शेड सुशोभीकरण, घनकचरा खत निर्मिती, सांडपाणी व मलनिस्सारण, भूमिगत गटारी, नदीकाठी जॉगिंग ट्रॅक्स, १ हजार वृक्षांची लागवड, सोलर लाईट बसवणे अशी अनेक कामे यात अंतर्भूत केली जाणार आहे. याप्रसंगी शिव नदी जवळ जेसीबी चे पूजन करून नारळ फोडून उद्घाटन करण्यात आले याप्रसंगी यावेळी लासलगाव चे सरपंच अफजल भाई शेख, उपसरपंच रामनाथ भाऊ शेजवळ, कृ.उ.बा. समितीच्या संचालिका तथा सुवर्णा ज्ञानेश्वर जगताप, पिंपळगाव नजीक चे सरपंच काशिनाथ माळी, ब्राह्मणगाव चे सरपंच गवळी, लासलगाव ग्राम. सदस्य चंद्रशेखर होळकर, संतोष पलोड, अश्विनी बर्डे, निकम, मंगेश गवळी, विष्णू लुटे, नाना पवार, पिंपळगाव नजीक ग्राम. सदस्या भारती महाले, मंगलबाई कुलकर्णी, रत्ना घोडे लासलगाव येथील राजेंद्र चाफेकर, अरुण भामरे, मनीष चोपडा, साहेबराव खलसे, धनंजय वाघचौरे, जाधव साहेब, शब्बीर भाई तसेच लासलगाव, पिंपळगाव नजीक व ब्राह्मणगाव येथील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## २ दिवसांच्या शिबिरात १ हजार ८१२ महिला कामगारांची नोंदणी

**अक्षराज : सुनील क्षिरसागर**


**दि.०४, लासलगाव (नाशिक) :** येथे सुवर्णयोग सामाजिक संस्था व सेवा फाऊंडेशन आयोजित महिला कामगार नोंदणी शिबीर लासलगाव येथील गणेश मंदिर, गणेशनगर, येथे दि. १ व २ ऑक्टोबर २०२४ रोजी सकाळी ९ ते ५ वाजे पर्यंत आयोजित करण्यात आले होते. या नोंदणी शिबीर मध्ये दोन्ही दिवशी गोणी कामगार, घर काम करणाऱ्या कामगार व इतर कामगार महिला यांनी मोठ्या संख्येने नोंदणी केली. कामगार नोंदणी शिबिर सुवर्णा जगताप, राजेंद्र चाफेकर, सुशील भोसले, उषा कुमावत, ज्योती शिंदे, शैलजा भावसार, रूपा केदारे, कविता आवारे,ज्ञरंजना शिंदे, पूजा भावसार, योगिता आंबेकर, भारती महाले ,सोनाली शिंदे, सिंधू पल्हार, नंदा शर्मा, कल्पना वाघ, अनिता खैरे यांनी प्रयत्न केले. शिबिर उद्घाटन प्रसंगी आयोजक सुवर्णयोग सामाजिक संस्थाचे संस्थापक अध्यक्षा सुवर्णाताई जगताप यांनी संगितले की, सध्या राज्यात कामगार कल्याण मंडळातर्फे महिला वर्गांना मोफत स्टील भांडे कीट देण्याचा उपक्रम सुरू आहे. त्याअनुषंगाने २ दिवसीय महिला कामगार नोंदणी शिबीरचे आयोजन करण्यात आले होते. लासलगाव व परिसरातील महिला कामगारांचे नवीन नाव नोंदणी वय १८ ते ६० वर्षे पर्यंत नाव नोंदणी करू शकतात. या योजनेत बांधकाम कामगाराचा बांधकामाच्या ठिकाणी अपघाती मृत्यु झाल्यास त्याच्या कायदेशीर वारसास वित्तीय साहाय्य देण्यात येते. बांधकाम कामगाराचा नैसर्गिक मृत्यू झाल्यास वित्तीय साहाय्य बांधकाम कामगाराचा गृहकर्जाच्या व्याजाच्या रकमेवर अनुदान तसेच १० वी व १२ वी ५० टक्केपेक्षा जास्त गुण असणाऱ्या विद्यार्थ्यांना तसेच सामाजिक सुरक्षा व अन्य योजना व बांधकाम कामगाराच्या पहिल्या विवाहाच्या प्रतिपूर्तीसाठी वित्तीय साहाय्य मिळू शकते. बांधकाम कामगारांच्या प्रधानमंत्री जीवनज्योती विमा योजना असे अनेक योजनाचे यामध्ये सम ावेश आहे. शिबिर यशस्वी करण्यासाठी सर्व कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.



## अज्ञात वाहनाच्या धडकेत तुंगतच्या युवकाचा मृत्यू

**अक्षराज : विकास सरवळे**

**दि.०५, पंढरपूर :** पंढरपूर मोहोळ या पालखी मार्गावर तांबोळी वस्ती या ठिकाणी अज्ञात वाहनाने समोरून धडक दिल्याने तुंगत येथील युवकाचा जागीच मृत्यू झाल्याची घटना दिनांक ०३ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ७ वाजता घडली. यासंदर्भात तालुका पोलिसांकडून समजलेली माहिती अशी की, तुंगत येथील अजित नागनाथ वनसाळे (वय २७) हे दिनांक ०३ ऑक्टोबर रोजी आपली मोटार सायकल क्र एमएच १३ ईजी ६२४७ वरुन सकाळी ९ वाजता त्यांची कासेगाव येथील बहीण संपदा जाधव यांना भेटण्यासाठी गेले होते. तिला भेटून परत गावी येत असताना सायंकाळी ७ वाजण्याच्या सुमारास तांबोळी वस्ती या ठिकाणी समोरून येणाऱ्या अज्ञात वाहनाने त्यांना जोरदार धडक दिली.



यामध्ये वनसाळे हे रस्त्याच्या बाजूला पडले. यासंदर्भात स्थानिक लोकांनी तुंगत येथील अजित यांचे भाऊ ग्रामपंचायत सदस्य बत्तास वनसाळे यांना माहिती दिली. वनसाळे हे सायंकाळी ७ वाजता अपघात ठिकाणी गेले असता अजित हे रस्त्याकडेला पडल्याचे दिसून आले. ताबडतोब त्यांनी त्यांना उपजिल्हा रुग्णालय या ठिकाणी उपचारासाठी हलवले, परंतु वैद्यकीय अधिकाऱ्यांनी ते मयत झाले असल्याचे सांगितले. यासंदर्भात बत्तास वनसाळे यांनी तालुका पोलीसात फिर्याद दिली आहे. मयत अजित वनसाळे याचे पश्चात पत्नी आणि दोन मुले आहेत.